**आदेश**

जा.क्र. ४४४३/कोरोना/मनाई/ आदेश/२०२०
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
दिनांक - ०३/०५/२०२०

**विषय :-फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे दि.०४/०५/२०२० चे ००.०१ ते दि.१७/०५/२०२० चे २४.०० वा. च्या मनाई आदेशाचा कालावधी अंशतः बदलांसह वाढविणेबाबत.**

...

(२) ज्याअर्थी, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर यांचेकडील जा.क्र. ४१५३/कोरोना/मनाई/आदेश/२०२०, दि.१४/०४/२०२० अन्वये नमुद मनाई आदेश **फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) अन्वये अंमलात आहे.**

(३) कोरोना विषाणुंचा प्रसार रोखण्यासाठीच्या उपाययोजनांचा भाग म्हणुन महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार (महाराष्ट्र राज्य महसुल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत आणि पुर्नवसन, मंत्रालय, मुंबई - संदर्भ क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि.०२/०५/२०२० अन्वये) संपुर्ण राज्यात दिनांक १७ मे २०२० पर्यत लॉकडाऊनची कालमर्यादा वाढवण्याची अधिसुचना जारी करण्यात आली आहे.

(४) महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग-१ मध्य उप-विभाग यांचे कडील अधिसुचना क्रमांक ३ मधील पान १९७३ (II -1974) चे कलम २१ अन्वये विशेष पोलीस महानिरीक्षक यांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन नियुक्त करु क्र. ४ मधील फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चा क्र.एमएससी-१२७४/व्ही-एफ मधील आदेशाने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता न कलम १४४ चे विशेष अधिकार प्रदान केलेले आहेत.

(५) त्याअर्थी मी, डॉ. रवींद्र शिसवे, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दि.०१/०४/१९७४ चे अधिसुचनेव्दारे प्राधिकृत अधिकारी म्हणुन पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात **राज्य शासनाच्या उपरोक्त परिच्छेद ३ आदेशान्वये मुदतवाढ देवुन** फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ (१) (३) अन्वये परिच्छेद -२ मधील उपरोक्त सर्व मनाई आदेशांना त्यांतील नमुद तरतुदींसह व परिच्छेद क्र.०६ मधील अंशत : बदल केलेप्रमाणे नमुद सुचनांना अधिन राहुन **दि.०४/०५/२०२० चे ००.०१ ते दि.१७/०५/२०२० चे २४.०० वा. चे पर्यत मुदतवाढ** लागू करण्यात येत आहे.

(६) **अतिरिक्त निर्बंध लागू असलेले प्रतिबंधित क्षेत्र वगळता इतर संक्रमणशील क्षेत्रात उपरोक्त मनाई आदेश खालील बाबतीत लागू होणार नाहीत. पुणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील अतिरिक्त निर्बंध लागु असलेले प्रतिबंधित क्षेत्र परिशिष्ट १ मध्ये नमुद करण्यात आले आहे.**

**अ.** ज्या बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी कामगार उपलब्ध असुन बाहेरून कामगार आणण्याची गरज नाही अशा प्रकल्पांना बांधकाम चालु ठेवणेबाबत प्रशासानाकडून परवानगी राहील.

**ब.** मान्सुन पूर्व आपत्ती निवारण संबंधित शासनाच्या विविध विभागांकडुन करण्यात येणारी कार्यवाही

**क.** मेट्रो प्रकल्प

**ड.** रोड/ गल्ली मधील जीवनावश्यक वस्तुंच्या विक्रीखेरीज इतर सामग्रीच्या विक्रीची जास्तीत जास्त पाच दुकाने चालु ठेवण्यास परवानगी राहील.

**इ.** उपरोक्त ६.ड मधील तरतुदीं अन्वये करावयाच्या कार्यवाही बाबत संबंधित पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी व महानगरपालिकेचे प्रभाग अधिकारी यांचे समन्वयाने पर्यवेक्षण राहील.

**ई.** जीवनावश्यक वस्तु व सेवा संबंधित तसेच उपरोक्त ६.ड मधील नमूद इतर सर्व दुकाने **सकाळी १०.०० वा. ते सांय. ०६.०० वा. पर्यंत** चालु ठेवता येतील.

**उ. घरपोच दुध वितरण सेवा** सकाळी **०७.०० ते १०.०० वा**. पर्यंत व दुकानातील दुध विक्री उपरोक्त ६.ई प्रमाणे निर्धारित कालमर्यादेत करण्यास परवानगी राहील.

**ऊ**. आरोग्य विभागाने सुचीत केलेल्या खबरदारीच्या उपाययोजनांची (उदा. मास्क, हॅण्डग्लोव्हज, फेसशिल्ड, सॅनिटायझर यांचा वापर तसेच सामाजिक अंतर ठेवणे) अंमलबजावणी करणे सर्व संबंधितांना अनिवार्य राहील.

**ए.** कोणत्याही कारणास्तव संचार करणा-या नागरिकांच्या हालचालींवर महाराष्ट्र शासनाचे निर्देशाप्रमाणे सांय. ०७.०० वा. ते सकाळी ०७.०० वा. पर्यंत बंधन असणे आवश्यक आहे. सबब, उपरोक्त सवलतींचा लाभ घेणा-या सर्व संबंधितांनी **सांय. ०७.०० वा. पुर्वी आपल्या वास्तव्याच्या ठिकाणी पोहचणे अनिवार्य** राहील.

**ऐ**. ६५ वर्षावरील व्यक्ती, दुर्धर आजाराने ग्रस्त, गर्भवती स्त्रिया, १० वर्षाखालील मुले यांनी केवळ अत्यावश्यक कारण व आरोग्यविषयक बाबींकरीता घराबाहेर पडावे. किंबहुना घरीच थांबण्यास सर्वोच्च प्राधान्य द्यावे.

**ओ.** परिशिष्ट १ मध्ये नमूद **प्रतिबंधित क्षेत्रात** यापुर्वी निर्देशित केल्याप्रमाणे जीवनावश्यक वस्तु व सेवा यांची विक्रीकेंद्रे **सकाळी १०.०० ते दु.०२.००** या कालावधीत चालू ठेवण्यास परवानगी राहील. तसेच या प्रतिबंधित क्षेत्रात यापुर्वी अंमलात असलेले अतिरिक्त निर्बंध कायम राहतील.

**औ.** यापुर्वीच्या मनाई आदेशांतर्गत सवलत दिलेल्या व्यक्ती व सेवांखेरीज इतरांना परिशिष्ट १ मधील नमूद प्रतिबंधित क्षेत्र व उर्वरीत क्षेत्र यामधील परस्पर प्रवासास पुर्णपणे मनाई राहील.

(७) सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८, साथरोग अधिनियम १८९७ मधील तरतुदी व प्रचलित कायदयांन्वये शिक्षेस पात्र राहील.

(८) आयुक्तालयातील काही विशिष्ट क्षेत्रात आवश्यकतेनुसार अतिरिक्त निर्बंध लागू करावयाचे असल्यास त्याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

(९) उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय पोलीस उप आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दि.०३/०५/२०२० रोजी दिलेला आहे.

**(डॉ. रवींद्र शिसवे)**
**पोलीस सह आयुक्त,**
**पुणे शहर**

**ठिकाण :- पुणे शहर**
**दिनांक :- ०३/०५/२०२०**

## परिशिष्ट - १

## अतिरिक्त निर्बध लागू असलेले अतिसंक्रमणशील क्षेत्र

| अ क्र | परिमंडळ | पोलीस स्टेशन | प्रतिबंधित क्षेत्र |
|---|---|---|---|
| १. | परिमंडळ -१ | **समर्थ** | संपुर्ण कार्यक्षेत्र |
| २. | परिमंडळ -१ | **खडक** | संपुर्ण कार्यक्षेत्र |
| ३. | परिमंडळ -१ | **फरासखाना** | संपुर्ण कार्यक्षेत्र |
| ४. | परिमंडळ -१ | **शिवाजीनगर** | शिवाजीनगर रेल्वे स्टेशन उत्तर बाजु , शिवाजीनगर कॉग्रेस भवनची मागील बाजु |
| ५. | परिमंडळ -२ | **स्वारगेट** | गुलटेकडी, महर्षीनगर झोपडपट्टी परिसर, डायस प्लॉट, इंदिरानगर, खड्डा झोपडपट्टी, मिनाताई ठाकरे वसाहत, सेव्हन्थ डे ॲडव्हॅनटीस्ट सॅरसबिरी, ढोले मळा झोपडपट्टी |
| ६. | परिमंडळ -२ | **लष्कर** | नविन मोदीखाना, पूना कॉलेज रोड, मोदीखाना कुरेशी मस्जिद जवळचा परिसर, भिमपुरा लेन, बाबाजान दर्गा/क्वॉर्टर गेट रोड, शिवाजी मार्केट/सरबतवाला चौक रोड, शितलादेवी मंदिर रोड, छावणी परिसर |
| ७. | परिमंडळ -२ | **बंडगार्डन** | ताडीवाला रोड, खाजगी रस्ता, लुंबिनी नगर, विश्वदिप तरुण मंडळ |
| ८. | परिमंडळ -२ | **सहकारनगर** | तळजाई वसाहत, बालाजीनगर, धनकवडी, गुलाबनगर-चैतन्यनगर, धनकवडी |
| ९. | परिमंडळ -२ | **भारती विद्यापीठ** | अंबामाता मंदीर कात्रज, जांभुळवाडी- साई समृद्धी |
| १०. | परिमंडळ -३ | **दत्तवाडी** | पर्वती दर्शन परिसर, शिवदर्शन, ५२ चाळ पर्वती ,दांडेकर पुल झोपडपट्टी ,दत्तवाडी पर्वती, इंदीरानगर झोपडपट्टी- निलायम चित्रपट गृह परिसर, |
| ११. | परिमंडळ -३ | **कोथरुड** | जय भवानी नगर, सुतारदरा, केळेवाडी, शिवतारा बिल्डींग बधाई स्वीट, महाराजा कॉम्प्लेक्स मागे चंद्रगुप्ता हौ. सोसा |
| १२. | परिमंडळ -३ | **सिंहगड रोड** | तुकाईनगर, महादेवनगर, साईनगर, खोराड वस्ती, राजीव गांधी वसाहत |
| १३. | परिमंडळ -४ | **येरवडा** | लक्ष्मीनगर, गाडीतळ, चित्रा चौक परिसर, गांधीनगर, येरवडा-ताडीगुत्ता, येरवडा-नागपुर चाळ, वॉर्ड नं-६ येरवडा गावठाण, कामराजनगर |
| १४. | परिमंडळ -४ | **खडकी** | पाटील इस्टेट झोपडपट्टी परिसर, इराणी वस्ती पाटकर प्लॉट, शिवाजीनगर रेल्वे स्टेशन उत्तर बाजु, कामगार आयुक्त कार्यालय परिसर, |
| १५. | परिमंडळ -४ | **विश्रांतवाडी** | आदर्श इंदीरानगर-आळंदी रोड, फुलेनगर-आळंदी रोड, जाधव वस्ती कळस |
| १६. | परिमंडळ -४ | **चंदननगर** | वडगाव शेरी- गणेशनगर, रामनगर टॅम्पो चौक वडगाव शेरी |
| १७. | परिमंडळ -४ | **विमानतळ** | कलवड वस्ती लोहगाव |
| १८. | परिमंडळ ५ | **कोंढवा** | एन.आय.बी.एम रोड प्रभाग क्र.२६, संपूर्ण कोंढवा खुर्द परिसर, नॉटींगहिल सोसायटी, संपूर्ण कोंढवा बुद्रूक परिसर, साईनगर कोंढवा प्रभाग क्र.२७, येवलेवाडी संपूर्ण परिसर, कृष्णानगर व महंमदवाडी संपूर्ण परिसर, अशोका म्युज सोसायटी - आशीर्वाद चौक , मिठानगर - सत्यानंद हॉस्पिटल गल्ली - भैरोबा मंदीर पी.एम.टी. बसस्टॉप - संत गाडगे महाराज शाळा - साई मंदीर ब्रम्हा ॲव्हेन्यु सोसायटी - शालीमार सोसायटी - कुमार पृथ्वी गंगाधाम रोड - मलीक नगर, होलेवस्ती- उंड्री, |
| १९. | परिमंडळ ५ | **वानवडी** | विकासनगर-घोरपडी, सय्यदनगर, रामटेकडी, चिंतामणीनगर, वॉर्ड नं.२४, हांडेवाडी रोड, काळेपडळ रेल्वे गेट ते दुर्गामाता मंदीर ते म्हसोबा मंदीर, ड्रिम्स आकृती सोसायटी, ढेरे मार्केट चिंतामणी नगर हांडेवाडी, प्रभाग क्र.२६ व २८, रामनगर, गुलामअली नगर, एसआरपीएफ गट क्र-२ परिसर |

| | | | |
|---|---|---|---|
| **२०.** | | **मुंढवा** | घोरपडी गांव, बी.टी. कवडे रोड, विकासनगर, बालाजीनगर, श्रावस्ती नगर प्रभाग क्र.०२ |
| **२१.** | | **हडपसर** | सोलापूर रोड-ज्योती हॉटेलपासून मिरेकर वस्ती कॅनालचे उजवीकडील भाग, एच.पी. पेट्रोल पंप, महात्मा फुले वसाहत संपूर्ण रेल्वे लाईनकडील, इंदीरानगर झोपडपट्टी , डीपी रोड म्हाडा कॉलनी, हिंगणे मळा ओढ्याकडील संपूर्ण परिसर, माळवाडी परिसर, गोसावी वस्ती वैदुवाडी परिसर, हडपसर - आदर्श कॉलनी- वेताळनगर - सातववाडी- माळवाडी |
| **२२.** | | **बिबवेवाडी** | अप्पर इंदीरानगर, सर्व्हे नं-६५० बिबवेवाडी |
| **२३.** | | **मार्केटयार्ड** | डॉ.आंबेडकर नगर, प्रेमनगर झोपडपट्टी |